आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ जून २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- देशातल्या आर्थिक सुधारणा आणि सर्व भारतीयांच्या कष्टामुळं देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- पंजाबमध्ये रस्ते अपघातात ९ जणांचा मृत्यू, २२ जण जखमी

- नॉर्वे बुद्धीबळ स्पर्धा जिंकणारा आर. प्रज्ञानंद ठरला पहिला भारतीय

**आणि**

- नैऋत्य मौसमी पाऊस राज्यात दाखल

<><><><><>

गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ७ दशांश टक्के असेल असा अंदाज केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयानं वर्तवला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के होता. २०२५-२६ या आर्थिक वर्षात देशाचं ढोबळ उत्पन्न ३२३ लाख कोटी रुपये असेल असा अंदाजही सरकारनं वर्तवला आहे. यापूर्वीच्या आर्थिक वर्षात ते २९९ लाख कोटी रुपये होतं.

गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत आर्थिक वृद्धीचा दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के होता.

देशात सुरू असलेल्या आर्थिक सुधारणा आणि १४० कोटी भारतीयांच्या कष्टामुळं देशाचा आर्थिक विकास दर एवढ्या मोठ्या प्रमाणात असल्याचा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. लोकांचं राहणीमान सुधारणं, व्यवसाय सुलभता आणि युवकांसाठीच्या संधींमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात सरकार कुठेही कमी पडणार नाही, असंही ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं गेल्या १२ वर्षात राबवलेल्या सुधारणांमुळं भारतीय अर्थव्यवस्था अशा मजबूत स्थितीत पोहोचल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. जगातले अनेक देश आर्थिक अनिश्चिततेत असताना भारत हा जगातली सर्वाधिक वेगानं वृद्धी होणारी महत्त्वाची अर्थव्यवस्था म्हणून पुन्हा एकदा उदयाला आल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ जून २०२६ - शनिवार

<><><><><>

कॉकरोच जनता पार्टीच्या नवी दिल्लीतल्या आंदोलनाला सुरूवात झाली आहे. पार्टीच्या मागण्यांऐवजी त्यांच्या समाज माध्यमातल्या खात्यांवर कारवाई केल्यावरुन पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी सरकारवर टीका केली. नीट परीक्षेतल्या पेपरफुटीवरुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा अशी त्यांची मागणी आहे. या निदर्शकांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच काही शालेय विद्यार्थीही आपल्या पालकांसह सहभागी झाले आहेत. परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमध्ये होत असलेल्या कथित अनियमिततेचा निषेध करत याचं उत्तरदायित्व स्विकारण्याची निदर्शकांची मागणी आहे. सामाजिक कार्यकर्ता सोनम वांगचुक यांनीही निदर्शकांना समर्थन देत अभिजीत दिपकेला अटक झाल्यास आपण सहा आठवड्यांचं उपोषण करू असा इशारा दिला आहे. निदर्शकांनी शिस्त आणि शांततामय मार्गानं निदर्शनं करावीत असं आवाहन दिपकेनं केलं आहे. दरम्यान, अभिजीत दिपकेच्या छत्रपती संभाजीनगर इथल्या निवासस्थानी पोलीस बंदोबस्त ठेवल्याची माहिती पोलीस उपायुक्तांनी दिली आहे.

<><><><><>

पंजाब मध्ये फिरोझपूर - फाजिका इथं आज एक खाजगी वाहन आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर २२ जण जखमी झाले. मृत्युमुखी पडलेले सर्वजण एकाच कुटुंबातले होते. कुटुंबातल्या एका व्यक्तीच्या अस्थिविसर्जनासाठी बियास नदीच्या दिशेनं त्यांची गाडी जात असताना हा अपघात झाला. जखमींपैकी अनेकजणांची प्रकृती गंभीर असून त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

दिल्ली मध्ये मालवीय नगर इथं ३ जून रोजी एका हॉटेलमध्ये लागलेल्या आग प्रकरणी दिल्ली पोलिसांनी हॉटेलच्या आचाऱ्याला अटक केली आहे. केशव नेगी असं त्याचं नाव आहे. याआधी हॉटेलच्या मालकाला देखील सदोष मनुष्यवध आणि इतर संबंधित कलमांखाली अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला तर ४० जण जखमी झाले.

<><><><><>

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतल्या आपल्या तात्पुरत्या सदस्यत्वाचा वापर करून पाकिस्तान जम्मू आणि काश्मीरबाबत खोट्या गोष्टी पसरवत आहे, असं भारताने म्हटलं आहे. जम्मू काश्मीर भारताचा अविभाज्य भाग होतं, आहे आणि राहील हे सत्य पाकिस्तानच्या पोकळ दाव्यांनी बदलणार नाही असं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतले भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश म्हणाले. पाकिस्ताननं जबाबदारीनं वागण्याचा सल्लाही त्यांनी दिला. पाकिस्तानचे सुरक्षा परिषदेतले स्थायी प्रतिनिधी असिम इफ्तिकार अहमद यांनी आमसभेत सादर केलेल्या वार्षिक अहवालावरील चर्चेदरम्यान जम्मू काश्मीरबाबत केलेल्या वक्तव्यांना उत्तर देताना हरीश बोलत होते.

<><><><>

अमेरिकेमध्ये कायमस्वरूपी वास्तव्यासाठी परदेशी नागरिकांकडून ग्रीन कार्डच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा एच-1बी व्हिसा रद्द करण्याचा प्रस्ताव अमेरिकेच्या संसदेत मांडण्यात आला आहे. काँग्रेस सदस्य चिप रॉय यांनी यासंदर्भात अमेरिकन व्हाईट-कॉलर वर्कर जॉब्स ॲक्ट सादर केला. या प्रस्तावित विधेयकात 'ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग' कार्यक्रम देखील रद्द करण्याची मागणी केली असून याअंतर्गत परदेशी विद्यार्थ्यांना पदवीनंतर मर्यादित कालावधीसाठी अमेरिकेत काम करण्याची परवानगी मिळते. आता ही लॉटरी पद्धत बंद करुन परदेशी नागरिकांना केवळ प्रतिभेच्या आधारे अमेरिकेत प्रवेश मिळवण्याची तसंच नोकऱ्यांमध्ये अमेरिकेतल्या नागरिकांना प्रथम संधी देण्याची वेळ आली आहे, असं या विधेयकात म्हटलं आहे.

<><><><>

इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी आणि आखाती अरब मित्रराष्ट्रांच्या दिशेनं डागलेली क्षेपणास्त्रं आणि ड्रोन पाडल्याचा दावा अमेरिकी लष्करानं केला आहे.तसंच इस्लामिक रिपब्लिकच्या किनारपट्टीवरच्या काही रडार यंत्रणांवर देखील हल्ले केले आहेत. मात्र इराणनं केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं सांगितलं. त्याआधी इराणनं कुवेत आणि बहरीनच्या दिशेनं सात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रं डागली होती त्यापैकी सहा क्षेपणास्त्रं अमेरिकी सैन्यानं रोखली, तर सातवं क्षेपणास्त्र लक्ष्यापर्यंत पोहोचू शकलं नाही. या घटनेत अमेरिकी जवानांना कोणतीही इजा झाल्याचं वृत्त नाही, असं अमेरिकी लष्करानं म्हटलं आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदी करण्यासाठी

आवश्यक असलेली परिस्थिती मुळातच तणावपूर्ण असून नव्यानं होत असलेल्या या हल्ल्यांमुळे ती अधिक बिकट बनली आहे. दोन्ही देशांमधला संघर्ष मिटवण्यासाठी करार करण्याच्या उद्देशानं ट्रम्प प्रशासन इराणवरचा दबाव वाढवत असतानाच हे हल्ले प्रतिहल्ले होत आहेत.

<><><><>

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांचा प्रत्यक्ष भेटून संवाद साधण्याचा प्रस्ताव फेटाळला आहे. रशिया आणि युक्रेन संघर्ष समाप्त करण्याच्या हेतूनं या भेटीत काही तोडगा निघू शकेल, या उद्देशानं झेलेन्स्की यांनी पुतीन यांना एका खुल्या पत्रातून चर्चेचा प्रस्ताव सादर केला होता. मात्र झेलेन्स्की यांच्या पत्रात तितकंसं गांभीर्य आढळलं नाही, असं सांगत पुतीन यांनी हा प्रस्ताव फेटाळला. तर पुतीन यांच्या या कृतीतून त्यांना हे युद्ध थांबवण्याची इच्छा दिसत नसल्याचं झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

<><><><>

ओस्लो इथं सुरु असलेल्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत अंतिम विजय मिळवत ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदनं इतिहास रचला आहे. अंतिम फेरीत त्यानं जर्मनीच्या व्हिन्सेंट केईमरचा पराभव केला. २०१३ मध्ये या स्पर्धेला सुरुवात झाल्यापासून भारताच्या विश्वनाथन आनंद आणि विश्वविजेता डी गुकेश यांना हुलकावणी दिलेल्या विजयावर चेन्नईच्या प्रज्ञानंदनं मात्र आज विजयाची मोहोर उमटवली. सर्वोत्कृष्ट खेळाचं प्रदर्शन करत प्रज्ञानंदनं १८ गुणांसह गुणतालिकेत आघाडी घेतली. अमेरिकेचा ग्रँडमास्टर वेस्ली सो १७ गुणांसह दुसऱ्या, ॲलीरेझा फायरौझा १५.५ गुणांसह तिसऱ्या, तर मॅग्नस कार्लसन १३ गुणांसह चौथ्या स्थानी राहिला.

<><><><>

जपान मध्ये ककामिगहरा इथं सुरु असलेल्या १८ वर्षांखालील पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताचा सामना यजमान जपान बरोबर होणार आहे. काल झालेल्या उपांत्य सामन्यात भारतानं आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५-३ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात जपाननं मलेशियाच्या ८-१ असा मोठ्या फरकानं पराभव करत अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीचा

सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. तिसऱ्या स्थानासाठी पाकिस्तानचा सामना मलेशियाबरोबर होईल.

**<><><><><>**

भारताच्या टी ट्वेंटी क्रिकेट संघाचा कर्णधार म्हणून बीसीसीआयनं श्रेयस अय्यरच्या नावाची घोषणा केली आहे. सूर्यकुमार यादवच्या जागी त्याची निवड झाली आहे. जपान इथं होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली. १५ वर्षाच्या वैभव सुर्यवंशीला या भारतीय संघात स्थान मिळालं आहे. भारतीय क्रिकेट संघातला सर्वात कमी वयाच्या खेळाडूचा सचिन तेंडुलकरचा विक्रम त्यांनं मोडीत काढला आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मान्सूनचं आज महाराष्ट्रात आगमन झालं. तळकोकणात आज मान्सून दाखल झाला. साधारण २० जूनपर्यंत संपूर्ण राज्यात नैऋत्य मौसमी पाऊस पडेल, असा अंदाज आहे. गेल्या वर्षी तो २५ मे रोजी राज्यात दाखल झाला होता. यंदा १० जूनपर्यंत मान्सून राज्यात येईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता.

दक्षिणेत संपूर्ण केरळ आणि तमिळनाडू, कर्नाटकचा अर्ध्यापेक्षा जास्त आणि आंध्र प्रदेशचा दक्षिणेकडचा काही भाग, तर ईशान्येला मिझोरामचा बहुतांश भाग आणि मणिपूरचा दक्षिणेकडचा प्रदेश व्यापून नैऋत्य मान्सून वेगाने पुढे सरकत आहे.

**//<><><><><>//**